## प्रेसनोट

दि. ०५/०३/२०२५

ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पुणे महानगरपालिकेच्या सिंहगडरोड क्षेत्रीय कार्यालयातील बिगारी सेवकेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.रं.नं १३३/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७अ अन्वये |
| तक्रारदार | पुरुष, वय ४६ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती. छाया यशवंत जातेंगावकर (कुकडे) वय ५७ वर्ष, पद – बिगारी सेवक, कर आकारणी विभाग, सिंहगडरोड क्षेत्रीय कार्यालय, पुणे म.न.पा. (वर्ग-४) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/- (दोन हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १,०००/- (एक हजार) रुपये |
| लाच मागणी पडताळणी दिनांक | २७/०१/२०२५ |
| ठिकाण | सिंहगडरोड क्षेत्रीय कार्यालय, महानगरपालिका पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. विजय पवार, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ८६०५००११९६ ) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे वडील दि. ८/०७/२०१२ रोजी मयत झाल्याने, त्यांचे राहते घराच्या मालमत्तेवर कर संकलन विभाग, सिंहगडरोड क्षेत्रीय कार्यालय, महानगरपालिका, पुणे येथे वारसदार नोंदणी करणे करीता लोकसेवक छाया जातेंगावकर (कुकडे) यांनी तक्रारदाराकडे २,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. २४/०१/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २७/०१/२०२५ रोजी लोकसेवक छाया जातेंगावकर (कुकडे) यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदाराकडे वरील नमुद काम करण्यासाठी २,००० रुपयाची लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती " शासकिय फी " व्यतिरिक्त १,००० रुपयाची लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याने, आज दि. ०५/०३/२०२५ रोजी लोकसेवक छाया जातेंगावकर (कुकडे), बिगारी सेवक यांचेविरुद्ध सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.रं.नं. १३३/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७अ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner